


# Tinder Dating Safety Guide

in collaboration with

## Centre for Social Research (CSR), India



सेंटर फॉर सोशल रिसर्च (सीएसआर), इंडियाच्या सहयोगाने तयार करण्यात आलेले टिंडर डेटिंग सेफ्टी गाइड वेगवान तांत्रिक प्रगतीच्या या युगामध्ये आपली आयुष्ये डिजिटल दुनियेशी अगदी बेमालूमपणे जोडली गेली आहेत, इतकी की त्यामुळे आपल्या इतरांशी जोडले जाण्याच्या, संवाद साधण्याच्या, सोबत शोधण्याच्या पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल घडून आला आहे. या गतीमान लँडस्केपमध्ये ऑनलाइन सुरक्षा आणि डिजिटल स्वास्थ्य यांचे महत्त्व सांगावे तितके थोडे आहे. आपल्या या डिजिटल अस्तित्वाच्या महत्त्वपूर्ण पैलूंना पुढे आणण्याच्या कामी सेंटर फॉर सोशल रिसर्च (सीएसआर), इंडिया दशकभराहून अधिक काळापासून आघाडीवर राहिले आहे.

आपल्या देशामध्ये ऑनलाइन डेटिंगचा अधिक सुरक्षित अनुभव निर्माण करण्याचे लक्ष्य बाळगून केलेला सीएसआर इंडिया आणि टिंडर यांच्यामधील हा सहयोगात्मक प्रयत्न मी अत्यंत अभिमानाने आपल्यासमोर सादर करीत आहे. अंतरे मिटवून टाकण्याची तंत्रज्ञानाची ताकद आश्चर्याने थक्क करणारी आहे हे खरेच, पण हे तंत्रज्ञान आपल्यासोबत जबाबदाऱ्या आणि आव्हानेही घेऊन येते. डिजिटल जगातील तुमचा प्रवास सुरक्षित आणि समृद्ध करणारा असावा याची काळजी घेण्यासाठी अनमोल ज्ञान, व्यावहारिक सल्ले आणि भक्कम आराखडा पुरविणारे हे ऑनलाइन सेफ्टी गाइड वाट दाखविणाऱ्या प्रकाशाचे काम करते.

टिंडरबरोबरची आमची भागीदारी यूजर्सची सुरक्षा, सक्षमता आणि शिक्षण यांच्याप्रतीच्या सामायिक बांधिलकीचे प्रतिनिधित्व करते. हे गाइड सादर करत असताना, माझ्या डोळ्यांसमोर एका अशा भविष्याचे चित्र आहे, जिथे संपूर्ण माहितीनिशी निर्णय घेण्यासाठी, संभाव्य धोक्यांना वेळीच ओळखण्यासाठी आणि ऑनलाइन जगामध्ये आत्मविश्वासाने आपली वाट शोधण्यासाठी व्यक्तींपाशी ज्ञानाचे शस्त्र असेल. डिजिटल स्वास्थ्याच्या क्षेत्रातील सीएसआर इंडियाचा दशकभराचा प्रदीर्घ अनुभव आणि डेटिंगकडे पाहण्याचा टिंडरचा नाविन्यपूर्ण दृष्टिकोन या दोहोंच्या एकत्र येण्यातून एक अधिक सुरक्षित आणि अधिक आदरशील डिजिटल डेटिंग अनुभव आकारास येत आहे असे मला ठामपणे वाटते.

हे गाइड प्रत्यक्षात उतरविण्यासाठी अथकपणे परिश्रम घेणाऱ्या सीएसआर इंडिया आणि टिंडरच्या समर्पित टीम्सची मी मनापासून कृतज्ञ आहे. चला, एकत्रितपणे आपण डिजिटल माध्यमात जबाबदारीने सहभागी होण्याच्या, विश्वास, आदर व सामायिक मूल्यांच्या पायावर आधारित नाती साकारण्याच्या मार्गावर पहिले पाऊल टाकू या. हे गाइड या मार्गावरील दीपस्तंभ ठरावे आणि त्याच्या प्रकाशात डिजिटली सुरक्षित आणि परिपूर्ण भविष्याच्या दिशेने जाणारा मार्ग उजळून निघावा ही सदिच्छा!

CSR

***Dr. Ranjana Kumari,***
***Director, Centre for Social Research***



Swipe and Swipe Right are registered trademarks of Match Group, LLC.

**२०१२ मध्ये सुरू झालेले टिंडर हे नव्या लोकांना भेटण्यासाठीचे जगातील सर्वात लोकप्रिय अॅप आहे व ते ५३० दशलक्ष वेळा डाऊनलोड करण्यात आले असून त्याने ७५ बिलियन्सहून अधिक जोड्या जमवून दिल्या आहेत.**

आमच्या प्रत्येक कृतीमध्ये यूजर्सच्या सुरक्षिततेला सर्वोच्च स्थान दिले जाते. सुरक्षेच्या मापदंडांशी आम्ही प्रदीर्घ काळापासून जपलेल्या बांधिलकीची सुरुवात आमच्या स्वाइप फीचरपासून सुरु झाली व हे प्रयत्न अंतिमत: दोन्ही बाजूंनी रस दाखवला तरच मेसेज पाठवता येईल या अटीपर्यंत पोहोचले.

सुरक्षेचे स्वरूप जटिल आणि वैयक्तिक असते हे आम्हाला माहीत आहे – आणि आम्ही अनेक वेगवेगळ्या कोनांतून ही सुरक्षा साधत असतो. टिंडर वापरत असताना यूजर्सना सुरक्षित ठेवण्याचे मार्ग शोधण्यामध्ये आम्ही सातत्याने गुंतवणूक करत असतो – ज्यात सुरक्षा वैशिष्ट्यांचा एक भरभक्कम संच आणि इन- अॅप शिक्षण, फसवणूक ओळखणारे तंत्रज्ञान आणि गरज भासेल तेव्हा कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांसोबत थेट काम करण्यापर्यंतच्या प्रयत्नांचा समावेश आहे.

कोणत्याही प्रकारचा छळ हा टिंडरच्या सामुदायिक मार्गदर्शक सूचनांमध्ये (Tinder's Community Guidelines) नेहमीच विरोध करण्यात आला आहे. आता प्रत्यक्ष भेटायला हरकत नाही या निर्णयापर्यंत म्हणजे आयआरएलच्या टप्प्यापर्यंत पोहोचण्याआधी एक निरोगी, आदरशील संवादाला प्रोत्साहन देणारी अनेक फीचर्स आम्ही तयार केली आहेत.

याशिवाय अभिनव उपाययोजना शोधण्यासाठी, सर्वोत्तम कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी आणि यूजर्सना कोणताही धोका अनुभवास आला तर त्यांची मदत करण्यासाठी एक ट्रॉमा-इन्फॉर्म्ड सपोर्ट प्रोग्राम निर्माण करण्यासाठी आम्ही बाहेरच्या भागीदारांबरोबर व तज्ज्ञांबरोबरही काम करतो.

---

## द सेंटर फॉर सोशल रिसर्च (सीएसआर), इंडिया

सीएसआर इंडिया ही भारतातील नवी दिल्ली स्थित ना-नफा तत्वावर चालणारी संस्था आहे, जिची स्थापना १९८३ साली झाली. सीएसआर इंडिया ही सामाजिक संशोधन, शिक्षण, क्षमता उभारणी आणि ॲडव्होकसीच्या माध्यमातून एक हिंसामुक्त, लैंगिक न्याय्यतेवर आधारित समाज घडविण्याप्रती समर्पित आहे.

चार दशकांपासून महिला चळवळीमधील आघाडीची संस्था असलेली सीएसआर इंडिया ही स्त्रियांना ऑनलाइन क्षेत्रासह सर्वत्र सुरक्षेची हमी देण्याप्रती समर्पित आहे. गेल्या दशकभराहून अधिक काळापासून आम्ही मुले, तरुण आणि महिलांसोबत काम करण्यामध्ये सक्रियरित्या सहभागी आहोत, व हे करताना आम्ही लैंगिक दृष्टिकोनातून डिजिटल सुरक्षा आणि ऑनलाइन स्वास्थ्यावर लक्ष केंद्रित करत आहोत.

शिक्षण, जाणिवजागृती आणि क्षमता उभारणीवर लक्ष केंद्रित करणाऱ्या अनेक कार्यक्रमांची एकाच वेळी अंमलबजावणी करत सीएसआर इंडियाने ५,००,००० हून अधिक थेट लाभार्थींचा व संभवत: लक्षावधी अप्रत्यक्ष लाभार्थींचा आकडा प्रभावीपणे गाठला आहे. या यशाचे श्रेय संस्थेच्या लिंगभावाबाबत संवेदनशील ऑनलाइन सेफ्टी एज्युकेशनल रिसोर्सेसना जाते.

भारतातील युवा डेटर्सना ऑनलाइन डेटिंगच्या जगामध्ये आपली वाट शोधण्यासाठी मदत करण्याच्या हेतूने टिंडर आणि सीएसआर इंडिया यांनी भागीदारी केली आहे. या सूचना डेटिंगच्या मौजेच्या व सुरक्षित अनुभवाची हमी देतानाच वेगवेगळ्या परिस्थितींना ओळखणे, त्यांची खूण पटविणे व त्यांना प्रतिसाद देणे यांच्याशीच संबंधित आहेत.

ऑनलाइन आणि ऑफलाइन दोन्ही ठिकाणी दक्ष राहत आणि आदरशीलता जपत डेटिंगचा जास्तीत जास्त चांगला अनुभव कसा मिळवावा याची इत्यंभूत माहिती देणारे हे गाइड जरूर वाचा.



Swipe and Swipe Right are registered trademarks of Match Group, LLC.

# ऑनलाइन डेटिंग आणि टिंडर



जवळ-जवळ एका रात्रीत टिंडरने एक क्रांतीकारी नवा अनुभव सादर करत जगाची भेटीगाठी करण्याच्या पद्धतीत क्रांती घडवून आणली, ज्याचे नाव होते स्वाइप फीचर. गेल्या १३ वर्षांमध्ये टिंडरने उलथापालथ घडवून आणण्याइतक्या मोठ्या सामाजिक बदलाचे नेतृत्व केले आहे आणि भेटीगाठी जुळविण्याची आपली पद्धत टिंडरने कायमची बदलून टाकली आहे यात कोणतीही शंका नाही.

टिंडरने खूप चटकन वेग धरला यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही. स्वाइप फिचरमुळे संपूर्ण जगभरातील संभाव्य सोबतींचा एक विशाल, वैविध्यपूर्ण संच अगदी तुमच्या बोटांशी हजर झाला. माणसाची एखाद्या नव्या व्यक्तीला भेटण्याची तीव्र गरज टिंडरने थक्क करणाऱ्या सहजतेने आणि आश्चर्यकारकरित्या मजेदार पद्धतीने पूर्ण केली – आणि हे सारे तुम्हाला घरबसल्या करता येऊ लागले. अजूनही टिंडर प्रत्येक नव्या पिढीतील एकट्या जीवांना कोणा नव्या व्यक्तीशी आपल्या इच्छेनुसार कोणत्याही प्रकारे भेटण्याचे काम सोपे आणि मौजेचे बनवित आहे. इथे सुरु झालेला संवाद कधी अॅपवरील संदेशांच्या थोड्या देवाणघेवाणीपुरता असतो, एखाद्या दिवसापुरता वा रात्रीपुरता असतो किंवा आयुष्यभरासाठी सुरु राहतो.

सुरक्षा ही मौजमजा या दोन्ही गोष्टी एकमेकांच्या हातात हात घालूनच येतात; मजा किंवा सुरक्षितता नव्हे तर मजा आणि सुरक्षितता हा योग्य विचार आहे. आज लोक आपले खरेखुरे व्यक्तिमत्त्व व्यक्त करण्यासाठीच्या अवकाशांच्या शोधात आहेत. हे करायचे तर त्यांना सुरक्षित वाटणे गरजेचे आहे. आपण ज्या प्लॅटफॉर्म्सवर आपला वेळ घालवित आहोत त्याची आपल्या सुरक्षेत गुंतवणूक असावी अशी त्यांची अपेक्षा असणार.

निरोगी आणि सुरक्षित डेटिंगची सुरुवात ही तुम्ही ज्या क्षणी आपले टिंडर प्रोफाइल तयार करता आणि आपले पहिले 'लाइक' पाठवता त्या क्षणापासूनच सुरु होते असे टिंडरमध्ये आम्हाला ठामपणे वाटते. लोकांना एकमेकांना भेटण्याची संधी मिळावी व ऑनलाइन तसेच ऑफलाइन दोन्ही ठिकाणी आपली सुरक्षितता जपता यावी यासाठी या उद्योगक्षेत्राचे नेतृत्व करणाऱ्या पद्धती निर्माण करण्यावर आम्ही आमचे लक्ष केंद्रित केले आहे.


***Papri Dev***

***Vice President, APAC Communications, Tinder***



Swipe and Swipe Right are registered trademarks of Match Group, LLC.

# टिंडरच्या कम्युनिटी गाइडलाइन्स




लोक जेव्हा अॅपसाठी पहिल्यांदा साइन अप करतात तेव्हा त्यांना आमच्या कम्युनिटी गाइडलाइन्सना संमती द्यावी लागते. टिंडरकडून यूजर्सना पहिल्यांदा हाच संदेश पाठवला जातो – आणि तो सुरक्षा व आदरभावावर लक्ष केंद्रित करणारा असतो. ही साधीसोपी आचारसंहिता पुरवित नव्या यूजर्सनाही टिंडरच्या सेफ्टी टिप्सकडे वळवले जाते.

**बी युअरसेल्फ**

तुम्ही जसे आहात तसेच दिसा
तुमचे फोटो, वय आणि वैयक्तिक माहिती तुमच्या खऱ्या ओळखीशी प्रामाणिक असेल याची खातरजमा करा

**सुरक्षित रहा**

आपली खासगी माहिती देण्याची घाई करू नका

**आपले वर्तन शांत आणि संयत राखा**

इतरांना आदर द्या आणि आपल्याला जशी वागणूक मिळावी असे तुम्हाला वाटते तशीच वागणूक त्यांना द्या.

**पुढाकार घ्या**


नेहमी वाईट वर्तणुकीची तक्रार करा



Swipe and Swipe Right are registered trademarks of Match Group, LLC.

# टिंडरच्या कम्युनिटी गाइडलाइन्स

## (टिंडरवर या गोष्टी करण्यास मनाई आहे)




तुम्ही इतरांप्रती प्रामाणिक, प्रेमळ आणि आदरशील आहात तर टिंडरवर तुमचे सदैव स्वागत आहे. तुम्ही तसे नसण्याचे ठरवलेत तर मात्र तुम्ही इथे फार काळ टिकणार नाही. इतरांचा उपमर्द होत नाही इतकी काळजी घेत स्वत:ची अस्सल ओळख व्यक्त करण्याची मुभा यूजर्सना मिळावी हे आमचे लक्ष्य आहे. इथे सर्वांसाठी समान निकष आहेत. तुम्ही समंजसपणे वागावे, कृती करण्यापूर्वी विचार करावा आणि ऑनलाइन तसेच ऑफलाइन अशा दोन्ही ठिकाणी कम्युनिटी गाइडलाइन्सचे पालन करावे असे आमचे तुम्हाला सांगणे आहे. हो, तुम्ही ऐकताय ते खरे आहे: तुमच्या ऑफलाइन वर्तनामुळे तुमचे टिंडर अकाउंट बंद केले जाऊ शकते.

आमच्या सामुदायिक धोरणांची यादी पुढीलप्रमाणे. यातील कोणत्याही धोरणाचे तुमच्याकडून उल्लंघन झाल्यास, तुम्हाला टिंडरवर येण्यापासून बंदी घातली जाऊ शकते आणि एकदा आम्ही हा निर्णय घेतला की त्यात फेरफार होणार नाहीत.


- नग्नता/लैंगिक मजकूर
- सतावणूक
- हिंसा आणि शारीरिक इजा पोहोचवणे
- द्वेषपूर्ण भाषा
- खासगी माहिती
- स्पॅम
- पैशांच्या मोबदल्यात शरीरसंबंधांचा पुरस्कार
- वेश्याव्यवसाय व मनुष्य तस्करी
- फसवणूक
- तोतयेगिरी
- अल्पवयीन असणे
- कॉपीराइट आणि ट्रेडमार्कचे उल्लंघन
- बेकायदेशीर वापर
- अनेक अकाउन्ट्स चालवणे
- थर्ड पार्टी ॲप्स
- हिंसक कन्टेन्ट
- व्यवसायाचा प्रचार
- सोशल मीडिया हॅण्डल्स
- संमतीविना इमेजेस पोस्ट करणे



Swipe and Swipe Right are registered trademarks of Match Group, LLC.

# टिंडरची भारतातील सुरक्षा वैशिष्ट्ये

दर दिवशी, लोक नवीन लोकांशी ओळख करून घेण्यासाठी टिंडरवर विश्वास ठेवतात. या विश्वासाबरोबरच एक अत्यावश्यक जबाबदारीही येते आणि प्रत्येक अनुभव सुरक्षित, आदरशील आणि सकारात्मक बनावा यासाठी हे ॲप स्वत:मध्ये सातत्याने नवनवे बदल करत असते. सर्चिंगपासून ते मेसेजिंगपर्यंत ते व्हिडिओ चॅटिंगपर्यंत भारतातील टिंडरवरील काही सर्वोत्तम सुरक्षा-केंद्री वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे




## *Mutual Matching*

संवाद सुरु करण्यासाठी दोन व्यक्तींनी आपापल्या बाजूने परस्परांना लाइक केलेले असायलाच हवे जे 'स्वाइप राइट' वैशिष्ट्यामुळे हे शक्य झाले आहे, कारण याचा अर्थ कोणत्याही व्यक्तीला त्यांनी ज्या व्यक्तीमध्ये रस दाखविलेला नाही अशा व्यक्तीकडून अवांछित मेसेज मिळत नाही.





## *Photo Verification*

एकदा का एखाद्या व्यक्तीने आपले टिंडर प्रोफाइल तयार केले आणि साइन-अप प्रक्रियेदरम्यान आपले फोटो टाकले की त्यांना टिंडरचे फोटो व्हेरिफिकेशन फीचर वापरण्यास प्रोत्साहन दिले जाते. जे यूजर्स अशाप्रकारे आपल्या फोटोंची पडताळणी करून घेतात त्यांना एक ब्लू टिक मिळते आणि त्यांना मॅच मिळण्याची शक्यताही वाढते. यूजर्स आपल्या मेसेच सेटिंग्जमध्ये जाऊन केवळ आपले फोटो व्हेरिफाय केलेल्या यूजर्सकडूनच मेसेज मिळावेत असा पर्याय निवडू शकतात.




Swipe and Swipe Right are registered trademarks of Match Group, LLC.





## *Video Selfie*

व्हिडिओ सेल्फी हे फोटो पडताळणीच्या प्रक्रियेला आणखी पुढच्या पातळीवर घेऊन जाते. आतापर्यंत यूजर्स अनेक प्रकारच्या पोझेसमधील स्थिर फोटो घ्यायचे आणि या फोटोंची यूजर्स प्रोफाइलवरील इतर फोटोंशी तुलना केली जायची. आता मात्र यूजर्सना आपल्या फोटोंची पडताळणी करायची असेल तर त्यांना व्हिडिओ प्रॉम्प्ट्सची एक मालिका पूर्ण करावी लागेल. कोणतीही फोटोपडताळणी अचूक नसते, मात्र या वैशिष्ट्यामुळे टिंडरला आपले ब्लू चेकमार्क्स अधिक अस्सल ठेवता येतात.





## *India Safety Centre*

टिंडरचे सेफ्टी सेंटर हा या ॲपचा एक संवादात्मक भाग आहे, ज्यात सेफ्टी आणि प्रायव्हसी फीचर्सविषयी स्थानिक संसाधने, लेख, टिप्स, प्रश्नमंजुषा यांचा समावेश आहे. सेटिंग्जमध्ये आणि यूजर्स चॅटिंग करत असताना झळकणाऱ्या सेफ्टी शिल्डमध्ये ते सर्वकाळ उपलब्ध आहे. हे सेफ्टी सेंटर केवळ संरक्षणासाठीच नव्हे तर यूजर्सना शिक्षित करण्यासाठी मॅच ग्रुप ॲडव्हायसरी काउन्सिल आणि आणखी काही भागीदार एनजीओंच्या सहयोगाने विकसित करण्यात आले आहे, जेणेकरून त्यांना ॲप आणि प्रत्यक्ष भेटीसाठी अधिक माहितीनिशी निवड करता यावी.




## *Unmatch*

एखादी व्यक्ती आपल्यासाठी साजेशी नाही असे वाटल्यास किंवा एखाद्या अधिक गंभीर कारणासाठी अशा व्यक्तीला अनमॅच करण्याची किंवा ब्लॉक करण्याची सोय टिंडर यूजर्सकडे आहे. एकदा का एखाद्या व्यक्तीला अनमॅच केले की त्यानंतर ती व्यक्ती तुमच्या मॅच लिस्टमध्ये किंवा मॅसेज लिस्टमध्ये दिसत नाही आणि त्या व्यक्तीलाही त्यानंतर तुमचे मेसेजेस पाहता येत नाहीत. आपण अनमॅच करण्यासाठी निवडलेल्या किंवा ज्याच्याकडून अनमॅच करण्यात आले आहे अशा व्यक्तीविषयी कधीही रिपोर्ट करू शकतात.





## *Are You Sure?*

प्रेषक एखादा आक्षेपार्ह ठरू शकेल असा संदेश पाठवण्याच्या बेतात असेल, तर हे फीचर त्याला ‘आर यू श्युअर’ असा प्रश्न विचारण्यास प्रेरणा देते. टिंडर केवळ अनुचित आशयाबाबत कळवणाऱ्या लोकांवर अवलंबून राहत नाही, तर त्यांना पकडण्यासाठीही सक्रियपणे काम करते. टिंडरने धोकादायक किंवा अनुचित म्हणून वर्गीकृत केलेल्या भाषेमध्ये अधिक शब्दांचा समावेश करण्यासाठी या फीचरमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. उदाहरणार्थ, द्वेष पसरवणारी भाषा, लैंगिक शोषण किंवा छळ करणारी भाषा. वाईट वर्तन आणि अनुचित आशयाचे नमुने यांची परिणती नेहमीप्रमाणे टिंडरवरून एखाद्याला निष्कासित करून टाकण्यात होऊ शकते.




Swipe and Swipe Right are registered trademarks of Match Group, LLC.




## Video Chat

टिंडरचे व्हिडिओ चॅट फीचर नियंत्रण आणि सुविधा यांना प्रथम प्राधान्य देत तयार करण्यात आले आहे. इन-अॅप व्हिडिओ कॉलिंग वैशिष्ट्यामुळे यूजर्सना डिजिटल मंचावर भेटता येते, आपल्या मॅचचा खरेपणा पडताळता येतो आणि IRL date अर्थात प्रत्यक्ष भेटीआधी दोघांच्या स्वभावाच्या तारा जुळतात का हे अधिक चांगल्या प्रकारे जोखता येते आणि हे सारे संपर्काचे खासगी तपशील जाहीर केल्याशिवाय करता येते.




## Does This Bother You?

वापरकर्त्याला टिंडरवर एखादा आक्षेपार्ह ठरू शकेल असा संदेश जेव्हा येतो, तेव्हा आर यू शुअर?प्रमाणेच डझ धिस बॉदर यू? हा प्रश्नही त्याला विचारला जातो. 'डझ धिस बॉदर यू' या प्रश्नाला जेव्हा वापरकर्ता 'येस' असा प्रतिसाद देतो, तेव्हा प्रेषकाच्या या वर्तनाबद्दल कळवण्याचा पर्याय त्याला/तिला दिला जातो. या फीचरमुळे छळाची प्रकरणे कळवली जाण्याचे प्रमाण वाढण्यात मदत झाली आहे. टिंडरने धोकादायक किंवा अनुचित म्हणून वर्गीकृत केलेल्या भाषेमध्ये अधिक शब्दांचा समावेश करण्यासाठी या फीचरमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. उदाहरणार्थ, द्वेष पसरवणारी भाषा, लैंगिक शोषण किंवा छळ करणारी भाषा.





## Share My Date

आपण ज्या पार्टनर्सबरोबर मॅच केले आहे त्यांच्याशी होऊ घातलेल्या भेटीगाठींचे तपशील आपल्या विश्वासातील व्यक्तींना पुरविण्याची परवानगी टिंडर देते. यामुळे यूजर कुठे आणि कोणाबरोबर जात आहे याची माहिती इतरांना कळते. शेअर माय डेट (Share My Date) ही सुविधा मित्रमंडळी, पालक आणि समवयीन व्यक्ती अशा सगळ्यांसाठीच आहे. एका साध्या लिंकचा वापर करून यूजर भेटीचे ठिकाण, तारीख वेळ आणि आपल्या मॅचचा फोटो या सर्व तपशीलांसह आपल्या डेटची माहिती इतरांना देऊ शकतात. आपल्या डेटची माहिती कुणाला द्यायची हे त्यांना ठरवता येते आणि अॅपमध्येच पुढील ३० दिवसांच्या कालावधीमध्ये हव्या तेवढ्या डेट्स तयार करता येतात.




Swipe and Swipe Right are registered trademarks of Match Group, LLC.





## *User Warning*

अन्य वापरकर्त्यांशी संवाद साधताना तसेच छळ, जाहिरातबाजी किंवा तोतयागिरीच्या समस्या हाताळताना पारदर्शकता वाढवणे आणि इन-ॲप वर्तनात सुधारणा घडवून आणणे हे नवीन 'वॉर्निंग्ज' (warnings)मागील उद्दिष्ट आहे. या वॉर्निंग्ज वापरकर्त्याला अनुचित वर्तनाबद्दल माहिती देण्यासाठी अतिरिक्त मार्गदर्शन देऊ करतात तसेच त्यांच्या कृती सुधारण्यासाठी तत्काळ संधी पुरवतात. त्यांचे वर्गीकरण अस्सलता, आदर आणि समावेशकता या तीन प्रवर्गांमध्ये करण्यात आले आहे. त्यामुळे अधिक सुरक्षित व अधिक आदरयुक्त ऑनलाइन वातावरण निर्माण करण्यात मदत होत आहे.





## *Reporting*

टिंडर तंत्रज्ञान आणि मानवी परीक्षण यांचा संयोग साधणारे ठोस रिपोर्टिंग नेटवर्क वापरते. त्यामुळे वापरकर्त्यांच्या वर्तनाचे मूल्यमापन वेगाने करता येते आणि तो/ती आमच्या समुदाय मार्गदर्शक तत्त्वांचे पालन काटेकोरपणे करेल याची खातरजमा होते. वापरकर्ते एखाद्या प्रोफाइलबाबत थेट रिपोर्ट करू शकतात किंवा ॲपमधील सेफ्टी सेंटरमार्फत कधीही संपर्क साधू शकतात. आम्ही रिपोर्ट्स खूपच गांभीर्याने घेतो.




## *Block Contacts*

वापरकर्त्यांना अ ॅपमधील जे वैयक्तिक संपर्क बघायचे नाहीत किंवा ज्या वैयक्तिक संपर्कांनी आपली प्रोफाइल बघू नये असे वाटते, त्यांना ब्लॉक करण्याची मुभा ब्लॉक कॉण्टॅक्ट्स हे फीचर देते. त्यामुळे कोणत्याही अवांछित धक्क्यांशिवाय आत्मविश्वासाने नवीन कनेक्शन्स 'लाइक' करण्याची क्षमता प्राप्त होते. हे संपर्क आधीपासून टिंडरवर असोत किंवा त्यांनी तीच संपर्क माहिती वापरून नंतर टिंडर डाउनलोड करण्याचा निर्णय घेतला असो, ते संभाव्य मॅच म्हणून कधीच दिसत नाहीत.






## *Traveller Alert*


जेव्हा एलजीबीटीक्यूआयए+ वापरकर्ते 'आयआरएल'मध्ये (वास्तव आयुष्यात) प्रवास करतात किंवा ज्या देशात त्यांच्या समुदायाला दंड केला जातो अशा देशात टिंडरचा पासपोर्ट फीचर वापरतात, तेव्हा त्यांना त्याबद्दल माहिती दिली जाते आणि त्यांची प्रोफाइल संबंधित भागात दाखवली जाण्यापूर्वीच त्यातून बाहेर पडण्याचा पर्याय त्यांना दिला जातो. प्रवासादरम्यान लोकांना भेटण्याचा टिंडर हा उत्तम मार्ग ठरू शकतो पण सुरक्षितता सर्वांत महत्त्वाची असते.



Swipe and Swipe Right are registered trademarks of Match Group, LLC.




## ***Block Profile***

वापरकर्त्यांना टिंडरवर काय बघण्याची इच्छा आहे हे निवडण्याचा पर्याय देण्यासाठी ब्लॉक प्रोफाइल ही महत्त्वपूर्ण पायरी आहे. आता प्रोफाइल्स सुचवल्या जात असताना, त्या जुळवून बघण्यापूर्वीच वापरकर्ते त्या ब्लॉक करू शकतात, जेणेकरून, त्या प्रोफाइल्स पुन्हा कधीच दिसणार नाहीत. बॉस किंवा पूर्वाश्रमीच्या प्रियकर-प्रेयसी यांची प्रोफाइल बघणे टाळण्याचा हा सोपा मार्ग आहे. या नवीन फीचरमध्ये ब्लॉक कॉण्टॅक्ट्स आणि रिपोर्ट करून ब्लॉक करण्याच्या अतिरिक्त सुविधाही देण्यात आल्या आहेत.

## ***Long Press Reporting***

वापरकर्त्यांना वाईट वर्तनाबद्दल कळवणे शक्य तेवढे सोपे व्हावे असे टिंडरला वाटते. लॉंग प्रेस रिपोर्टिंगमुळे लोकांना आक्षेपार्ह संदेशांवर टॅप आणि होल्ड करता येतात, त्यामुळे चॅट अनुभवातूनच थेट रिपोर्टिंग करता येते. हा प्रवाह सुलभ केल्यामुळे अधिकाधिक वापरकर्ते वाईट वर्तनाचे रिपोर्टिंग करतील अशी आशा टिंडरला वाटते, त्यामुळे समुदाय मार्गदर्शक तत्त्वांचे (कम्युनिटी गाइडलाइन्स) उल्लंघन करणाऱ्या खात्यांवर योग्य ती कारवाई करणे शक्य होते.

## ***Incognito Mode***

इनकॉग्निटो मोड म्हणजे तुमचे प्रोफाइल पूर्णपणे लपवण्यासाठी आणखी एक पाऊल पुढे टाकणे आहे. सबस्क्रायबर्स तरीही अॅपमध्ये ‘लाइक’ किंवा ‘नोप’ करू शकतात पण फक्त त्यांनी लाइक केलेल्या प्रोफाइल्सच त्यांना शिफारशींमध्ये (रेकमेंडेशन्स) दिसतात. टिंडरवर प्रोफाइल्स स्क्रोल करताना तुम्हाला कोण बघू शकेल याचे संपूर्ण नियंत्रण या फीचरमुळे तुमच्या हातात येते.



Swipe and Swipe Right are registered trademarks of Match Group, LLC.



# ग्रीन फ्लॅग्ज

डेटिंगच्या विश्वात अनेक धोक्याच्या इशाऱ्यांकडे अर्थात रेड फ्लॅग्जकडे लक्ष द्यावे लागते हे आपणा सर्वांना माहीत आहे पण या विश्वात अनेक ग्रीन फ्लॅग्ज अर्थात सकारात्मक खुणा आहेत हे तुम्हाला माहीत आहे का? या खुणा तुम्ही जिंकला आहात याची जाणीव करून देतात. ग्रीन फ्लॅग्जवर लक्ष केंद्रित करून तुमच्या हातातील नियंत्रण कायम राहील याची खातरजमा तुम्ही करू शकता आणि तुम्हाला 'कीपर' सापडला आहे याची पुष्टी करण्यातही तुम्हाला मदत होते.

## तुम्हाला दिसणाऱ्या ग्रीन फ्लॅग्जपैकी काही पुढीलप्रमाणे:

😇 एखाद्याचे व्यक्तिमत्व, त्याला/तिला रस वाटणाऱ्या बाबी आणि काहीवेळा अगदी विनोदबुद्धी यांचीही माहिती देणारे माहितीपूर्ण बायोज.

⏳ तुमच्यासाठी वेळ काढण्यास प्राधान्य दिले जाणे.

🗣️ मर्यादांची स्पष्टपणे चर्चा करणे.

✅ खुले विचार असणे आणि करुणा व्यक्त करणे.

🧐 ते जे शोधत आहेत, त्यामागील हेतू स्पष्ट केलेले असणे.

💬 संभाषण सुरू ठेवण्यासाठी तसेच ते रोचक करण्यासाठी प्रयत्न करणे.

🥰 छोट्या गोष्टी लक्षात ठेवणे.

🥺 तुमच्यापुढे मोकळेपणाने व्यक्त होणे.

🤩 तुम्ही जसे असाल त्या स्थितीत तुम्हाला मोकळे वाटायला लावणे.

🤗 संवादामध्ये सातत्य दाखवणे.



Swipe and Swipe Right are registered trademarks of Match Group, LLC.

# ऑनलाइन भेटगाठ

ऑनलाइन विश्वात सुरक्षित व अर्थपूर्ण संबंध तयार करणे

## वैयक्तिक तपशिलांचे संरक्षण करणे

जे लोक तुमच्या ओळखीचे नाहीत त्यांना कोणतीही वैयक्तिक माहिती देऊ नका. तुमची जन्मतारीख, पत्ता, तुम्ही कोणत्या कॉलेजला जाता किंवा कुठे काम करता, तुमच्या नियमित दिनक्रमाचे तपशील किंवा तुमच्या कुटुंबीय व मित्रमंडळी यांच्याबद्दलची कोणतीही माहिती खासगीच ठेवली पाहिजे.

## फोटो पडताळणी झालेल्या प्रोफाइल्स शोधा

ज्या लोकांच्या नावापुढे ब्लू टिक आहे त्यांच्याशीच प्रोफाइल जुळवल्यास बनावट प्रोफाइल्सशी सामना होण्याची शक्यता कमी होते. फोटो व्हेरिफिकेशनमुळे प्रोफाइलमधील व्यक्तीचा फोटो आणि अ◌ॅपमध्ये घेतलेल्या अनेक पोझ्ड फोटोंची तुलना करून खातरजमा करण्यात मदत होते. ज्यांच्या फोटोंची पडताळणी झाली आहे, त्याच व्यक्तींना बघण्याचा पर्याय तुम्ही टिंडरवर निवडू शकता.

## टिंडरला चिकटून राहा

एखाद्या मॅचसोबत तुमचे सूर जुळल्यानंतर, तो किंवा ती लगेचच दुसऱ्या एखाद्या अ◌ॅपकडे संभाषण वळवण्याचा प्रयत्न करत असेल तर सावध व दक्ष राहा. हा टिंडरचे सेफ मेसेज फिल्टर्स टाळून पुढे जाण्याचा प्रयत्न असू शकतो. टिंडर प्लॅटफॉर्मवर राहणे हा उत्तम (आणि सुरक्षित) पर्याय आहे, कारण, यात केवळ टेक्स्ट, इमोजी व व्हिडिओ कॉल्सची परवानगी आहे. त्याचप्रमाणे नको असलेली चित्रे पाठवली जाण्याबद्दलही चिंता करण्याची गरज यात पडत नाही.

## सुरक्षितता राखा

तुमच्या मॅचसोबत असलेल्या केमिस्ट्रीहून अधिक मजबूत असला पाहिजे तुमचा टिंडर पासवर्ड, हे खूपच महत्त्वाचे आहे. सार्वजनिक/सामाईक कम्प्युटरवरून लॉगिंग करताना काळजी घ्या आणि तुमचे यूजरनेम व पासवर्ड विचारणाऱ्या टिंडर ईमेल्सबाबत जागरूक राहा (आम्ही असे ईमेल्स कधीच पाठवत नाही). जर तुम्हाला खात्याची माहिती मागणारा ईमेल प्राप्त झाला, तर तत्काळ त्याची माहिती द्या!

## घोटाळ्यांबाबत जागरूक राहा

आर्थिक मदत मागणाऱ्या घोटाळेबाजांपासून तसेच फोन/व्हिडिओ कॉलवरून न बोलणाऱ्या कोणापासूनही सावध राहा — हे लोक जे दाखवतात ते नसण्याची शक्यता दाट असते. कोणी तुमचे प्रश्न टाळत असेल किंवा भेटल्याशिवाय, एकमेकांना ओळखल्याशिवाय नातेसंबंध सुरू करण्याचा आग्रह धरत असेल, तर हा कदाचित रेड फ्लॅग्ज असू शकेल (रेड फ्लॅग्ज या संभाव्य संकटात टाकणाऱ्या किंवा नकारात्मक वर्तनाचा इशारा असतो).



Swipe and Swipe Right are registered trademarks of Match Group, LLC.

# प्रत्यक्ष भेटगाठ

मजेशीर आणि सुरक्षित आयआरएल डेटिंग अनुभव

### पुरेसा वेळ घ्या
गोष्टी आयआरएल (वास्तव आयुष्यात) नेण्यापूर्वी संबंधित व्यक्तीला पूर्ण ओळखण्यासाठी पुरेसा वेळ घ्या. प्रश्न विचारण्यास घाबरू नका किंवा मॅचला भेटण्यापूर्वी त्याच्याशी/तिच्याशी स्क्रीनद्वारे व्हिडिओ चॅट करा. तुम्हाला मोकळेपणा वाटत असल्याची खात्री करा, घाई करू नका.

### सार्वजनिक ठिकाणी भेटा
तुम्ही प्रथमच भेटत असाल तर सार्वजनिक ठिकाणीच भेटा. क्युट कॅफेज, छानसे रेस्तराँ किंवा पार्क (बगिचा) ही पहिल्या डेटसाठी उत्तम ठिकाणे आहेत.

### मद्यपानावर मर्यादा ठेवा
नेहमी सावध आणि नियंत्रणात राहा. स्वत:च्या मर्यादा ओळखा आणि आपल्याला हवे असेल त्यापलीकडे मद्यपान करण्याबाबत कोणाच्याही दबावाखाली येऊ नका किंवा तसे करण्यासाठी तुम्हीही कोणावर दबाव टाकू नका. खरे तर चहा किंवा कॉफीचा आस्वाद घेणे, एखाद्या कॉमेडी शोला जाणे, कराओके नाइटचा आनंद लुटणे असे साधे डेट पर्याय निवडा. पहिल्या डेटला फार काही गडबड न होता संभाषण सुरू राहते.

### मद्यपानावर मर्यादा ठेवा
नेहमी सावध आणि नियंत्रणात राहा. स्वत:च्या मर्यादा ओळखा आणि आपल्याला हवे असेल त्यापलीकडे मद्यपान करण्याबाबत कोणाच्याही दबावाखाली येऊ नका किंवा तसे करण्यासाठी तुम्हीही कोणावर दबाव टाकू नका. खरे तर चहा किंवा कॉफीचा आस्वाद घेणे, एखाद्या कॉमेडी शोला जाणे, कराओके नाइटचा आनंद लुटणे असे साधे डेट पर्याय निवडा. पहिल्या डेटला फार काही गडबड न होता संभाषण सुरू राहते.

### नेहमी पर्यायी व्यवस्था तयार ठेवा
तुम्हाला चटकन बाहेर पडण्याची गरज पडल्यास, पर्यायी योजना सज्ज ठेवा आणि सुरक्षित राहा! मित्रमंडळींपैकी कोणाला तरी विश्वासात घ्या किंवा कुटुंबियांपैकी एखाद्याला तुम्ही कुठे आहात ते सांगून ठेवा. तुम्ही डेटसोबत कॅबने जात असाल, तर तुमचे राइड डिटेल्स (तपशील) एखाद्या मित्र-मैत्रिणीला कळवून ठेवा.

### आगाऊ पैसे देणे टाळा
तुमची/तुमचा डेट आधीच पैसे मागत असेल, तर हा रेड फ्लॅग आहे. प्रतिष्ठित ठिकाणी आगाऊ पैसे मागितले जात नाहीत!

### रेस्तराँची अस्सलता परीक्षणांद्वारे पडताळून बघा
एखाद्या फॅन्सी ठिकाणी डेटसाठी जाण्याची सूचना प्राप्त झाली आहे का? लगेच ऑनलाइन तपासून बघा. जर ते ठिकाण अपरिचित वाटत असेल, तर ओळखीचे ठिकाण निवडण्याबाबत विचार करा

### शेअर माय डेट'च्या माध्यमातून जवळच्या व्यक्तींना विश्वासात घ्या
तुमच्या डेटचे तपशील, उदाहरणार्थ, ठिकाण, वेळ, फोटो, 'शेअर माय डेट' ("Share My Date")च्या माध्यमातून तुमच्या जवळच्या व्यक्तींना सांगून ठेवल्यास अतिरिक्त सुरक्षितता मिळते.



Swipe and Swipe Right are registered trademarks of Match Group, LLC.

Let's talk
**Consent**

# संमती

डेटिंग आणि शारीरिक जवळीक या दोन्हींमधून वाट काढणे कठीण ठरू शकते. तुम्हाला भेटणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या स्वत:च्या अशा मर्यादा व अपेक्षा असतात- संवाद ही त्यावरील गुरुकिल्ली आहे. येथेच संमती महत्त्वाची ठरते. हा कोणत्याही संबंधाचा आवश्यक भाग आहे.

संमती घेणे खरे तर खूपच सोपे असते. कधी ही संमती शब्दांतून व्यक्त होते, तर कधी कृतींतून व्यक्त होते. महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, तुम्ही कोणाला ऑनलाइन किंवा व्यक्तीश: भेटत असाल, तर त्या व्यक्तीच्या सीमांचा आदर राखण्याची जबाबदारी तुमच्यावर असते आणि त्यांनीही तुमच्या सीमांचा आदर राखला पाहिजे. समोरच्या व्यक्तीला नेमके काय हवे आहे हे नीट कळत नसेल, तर स्पष्ट विचारा.

युवा आणि पिंक लीगल यांच्या सहयोगाने, टिंडरने अॅपवरील व अॅपबाहेरील संमतीसाठी www.letstalkconsent.com हे रिसोर्स सेंटर सुरु केले आहे. संमतीविषयक संवाद सुरु करणे आणि अधिक प्रामाणिक व अस्सल संभाषण हवे असलेल्या तरुणांना शिक्षित करणे हे या उपक्रमामागील उद्दिष्ट आहे.

शिवाय, युवाशी (Yuvaa.) सहयोगाने टिंडरने लेट्स टॉक कन्सेण्ट (Let's Talk Consent) हा अशा प्रकारचा एकमेव ऑनलाइन स्वयंअध्ययन अभ्यासक्रम सुरु केला आहे. हा अभ्यासक्रम आंतरव्यक्ती संमतीवर आधारित आहे. कोर्सेरा (Coursera)वर होस्ट केलेला हा मोफत अभ्यासक्रम भारतातील तरुणांना आंतरव्यक्ती संमतीविषयी खात्रीशीर व अस्सल मार्गदर्शन पुरवतो. अशा प्रकारचा हा पहिलाच अभ्यासक्रम आहे.


Swipe and Swipe Right are registered trademarks of Match Group, LLC.

# संमती मागे घेणे

ज्या क्षणी तुम्हाला अवघडल्यासारखे वाटेल, त्या क्षणी तुम्ही संमती मागे घेऊ शकता. या कृतीमध्ये आता आपल्याला मोकळेपणा वाटत नाही आहे आणि हे थांबवण्याची आपली इच्छा आहे हे जोडीदाराला स्पष्टपणे सांगणे हा एक मार्ग आहे. काही वेळा भाषिक पद्धतीने संमती मागे घेणे आव्हानात्मक किंवा कठीण ठरू शकते, अशा वेळी अभाषिक संकेत वापरले जाऊ शकतात. कोणत्याही लैंगिक कृतीमध्ये सर्वांना मोकळेपणा वाटत असल्याची खात्री करणे, हीच भावना कायम असल्याचे वेळोवेळी तपासत राहणे आणि या कृतीत बदल करण्यापूर्वी किंवा ती वाढवण्यापूर्वी सर्वांची संमती आहे याची खात्री करून घेणे हा सर्वोत्तम मार्ग आहे.

# संमती विचारणे

संमती नेहमीच भाषिक असते असे नाही पण वेगवेगळ्या लैंगिक कृतींसाठी भाषिक सहमती असल्यास तुम्हाला व तुमच्या जोडीदाराला परस्परांच्या सीमांचा आदर राखण्यात मदत होते. भाषिक संमतीमध्ये 'हो', 'थांबू नकोस' असे म्हणणे किंवा आपल्याला काय हवे आहे हे जोडीदाराला सांगणे आदी बाबींचा समावेश होतो. मान हलवणे, जोडीदाराला जवळ घेणे किंवा परस्परांना स्पर्श करण्यासारख्या पुढाकाराने केल्या जाणाऱ्या कृती ही अभाषिक संमतीची काही उदाहरणे आहेत.
तुम्ही नवीन जोडीदारासोबत असता, तेव्हा अभाषिक संभाषणामध्ये स्पष्टता कमी असू शकते हे लक्षात ठेवा, त्यामुळे तुम्ही एखाद्याला चांगले ओळखू लागत नाही तोपर्यंत भाषिक संमती घेणे सर्वांत उत्तम ठरते. शिवाय, संमती मागणे हेही काहीवेळा 'सेक्सी' ठरू शकते. संमती नेहमीच स्पष्ट, उत्साही असली पाहिजे आणि ती संपूर्ण लैंगिक क्रियेदरम्यान असली पाहिजे. जे काही घडत आहे, त्याबद्दल मोकळेपणा वाटणे आणि तो मोकळेपणा प्रत्येक पायरीवर समोरच्यापर्यंत पोहोचवणे नातेसंबंधातील प्रत्येकासाठी खरोखर महत्त्वाचे आहे.

# संमती देणे

तुमच्या संमतीचा भंग झाला असेल अशा परिस्थितीत तुम्ही असाल तर तुम्ही काय करू शकता ते येथे आहे:

## शांत राहा

शांतपणे परिस्थितीचे विश्लेषण करा आणि घाबरू नका. घाबरणे हे फक्त तुमचे मन ढळवेल आणि तुमची पुढील पावले काय असावीत याबद्दल स्पष्टपणे विचार करण्यात मदत करणार नाही.

## आपल्या आतडे अनुसरण करा

तुमच्या संमतीचा भंग झाला आहे की नाही याबद्दल तुम्ही संभ्रमात असल्यास, त्याचा भंग झाला असल्याची शक्यता आहे. लक्षात ठेवा, जर तुम्ही तुमची पूर्ण आणि उत्साही संमती दिली असती, तर प्रथमतः गोंधळ निर्माण होणार नाही. जेव्हा शंका असेल तेव्हा नेहमी आपल्या आतड्यांसह जा.

## तुमच्या आश्रयाची योजना करा

तुम्हाला पुढे कोणती कारवाई करायची आहे ते ठरवा. तुम्ही तुमच्या संमतीचा भंग करणाऱ्या भागीदाराशी सामना करणे किंवा चर्चा करणे निवडू शकता. तुम्ही संमतीच्या उल्लंघनासाठी भागीदाराविरुद्ध कायदेशीर कारवाई देखील करू शकता.

## ओझे वाटून घ्या

जर तुम्ही करू शकत असाल तर, तुमचा अनुभव, भावना आणि विचार तुमच्यावर विश्वास असलेल्या एखाद्यासोबत शेअर करा, जसे की कुटुंबातील सदस्य किंवा मित्र. हे तुमचे भावनिक ओझे कमी करण्यास मदत करेल. आपण कारवाई करण्याचे ठरविल्यास, या प्रक्रियेद्वारे साथीदार असणे आपल्यासाठी सोपे करेल.



Swipe and Swipe Right are registered trademarks of Match Group, LLC.

# TINDER LOVE & CARE

# लैंगिक स्वास्थ्य

लैंगिक संबंधांचा विषय येतो तेव्हा प्रत्येक व्यक्तीसाठी त्याचा अर्थ खूप वेगवेगळा असतो. तुमच्या लैंगिक गरजांची चर्चा कोणत्याही व्यक्तीसोबत करण्यापूर्वी तुमचा आराम तुम्ही आधी विचारात घेतला पाहिजे. तुम्हाला कोणासोबत कधी लैंगिक संबंध ठेवायचे आहेत, तुम्हाला नात्यात किती पुढे जायचे आहे आणि तुमच्या मर्यादा काय आहेत हे वैयक्तिक आणि वस्तुनिष्ठ विषय असू शकतात. ही चर्चा करण्याची कोणतीही 'योग्य' पद्धत नाही. महत्त्वाचा मुद्दा म्हणजे काळजीपूर्वक आणि संवेदनशीलतेने या गोष्टींबाबत चर्चा करणे जेणेकरून तुम्हा दोघांच्याही भावनांबद्दल ती आदरपूर्वक असेल.

टिंडर डेटिंग वेलनेस गाइड असलेल्या टिंडर लव्ह अँड केअर (Tinder Love and Care)मध्ये भारतातील ख्यातनाम महिला तज्ञ आणि बहुलिंगी व्यक्तींकडून स्वतःच्या आरोग्याला प्राधान्य देऊन लैंगिक आरोग्य, शारीरिक संबंध आणि आपल्या डेटसोबत प्रामाणिक संवाद या सर्वांबाबत सल्ले व माहिती आहे.

### विश्वास, आदर आणि काळजी

प्रत्येक लैंगिक अनुभवासाठी या तीन तडजोड न करण्याच्या बाबी आहेत. परंतु याचा अर्थ असा नाही की तुम्हाला एखाद्या व्यक्तीसोबत विवेकी संबंध स्थापित करण्याची गरज आहे. याचा अर्थ इतकाच की तुमच्या संबंधांचे उद्दिष्ट काहीही असले तरी तुम्हाला त्याचा आनंद घेता आला पाहिजे.

### छोट्या छोट्या गोष्टींना असलेले महत्त्व

कोणाशीही नाते प्रस्थापित करण्यासाठी लहान लहान गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. अगदी छोटेसे कौतुक, जसे तुमच्या डेटला ते छान दिसत आहेत हे सांगणे, तुम्हाला हे नाते आणखी फुलवायचे असल्यास जेवताना हात कुरवाळणे अशा गोष्टी महत्त्वाच्या आहेत.

### संवाद साधा

तुमच्या जोडीदारासोबत तुम्हा दोघांनाही सुरक्षित वाटत असलेल्या ठिकाणी तुम्हाला काय वाटते याची चर्चा करत थोडा वेळ घालवा. सुरक्षा, संमती आणि आनंद यांच्याबाबत मते जुळणे खूप महत्त्वाचे आहे, जेणेकरून तुम्ही दोघे हे ठरवू शकता की पहिल्यांदा लैंगिक संबंध प्रस्थापित करताना तुम्हाला काय करायला आणि टाळायला आवडेल.

### तुमचे मत बदलले तरी हरकत नाही


तुम्ही सुरुवात केली म्हणून तुम्हाला तो अनुभव घ्यायलाच पाहिजे असे काही नाही. तुम्हाला योग्य वाटत नसल्यास तुम्ही थोडे किंवा पूर्णपणे थांबू शकता. हळू जा, स्वतःच्या वेगाने जा आणि अर्थातच चांगला वेळ घालवा.

### अभिप्राय महत्त्वाचा आहे

संभोग सुरु असताना किंवा त्यानंतरही तुम्ही दोघांनी तुम्हाला काय वाटते हे सांगणे महत्त्वाचे आहे. तुम्हाला ज्या गोष्टींनी मजा आली, ज्या गोष्टी सामान्य होत्या किंवा ज्या अजिबात नकोच आहेत, तसेच पुढची वेळ येणार असेल तर त्या वेळी तुम्हाला कशाचा अनुभव घ्यावासा वाटेल त्याबद्दल तुम्ही बोलू शकता.



Swipe and Swipe Right are registered trademarks of Match Group, LLC.



# छळ

तुम्हाला काही जाणवल्यास तुम्ही त्याबद्दल बोला. एखाद्या व्यक्तीने मर्यादा ओलांडल्यास आम्हाला तुम्ही जरूर कळवा, कारण आम्हाला नवीन लोकांना भेटण्यासाठी टिंडरला एक सुरक्षित ठिकाण बनवायचे आहे: तुम्हाला असुरक्षिततेची भावना निर्माण करणाऱ्या किंवा आमच्या मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन करणाऱ्या, गंभीर गुन्हा केलेल्या किंवा यापूर्वी वैयक्तिक अनुभवातून अशा गोष्टी करणाऱ्या व्यक्तीबद्दल तुम्ही रिपोर्ट करू शकता. आम्ही पुढच्या काही पानांवर तक्रार कशी नोंदवायची हे तुम्हाला सांगत आहोत.

आम्ही इथे तुमच्यासाठी आहोत. आम्ही छळाकडे गांभीर्याने पाहतो आणि टिंडरवर आम्हाला हे नको आहे. आम्ही अकाऊंट्स का बॅन करतो त्याची काही उदाहरणे ही आहेत:

- भेदभावपूर्ण वर्तन, अपमानास्पद भाषा किंवा तिरस्कारयुक्त वक्तव्य
- ॲपवर किंवा बाहेर कोणालाही धमक्या किंवा अवमानजनक मेसेजेस पाठवणे.
- हिंसाचार आणि शारीरिक हिंसा
- तुमच्या मॅचच्या संमतीशिवाय अॅपबाहेर लैंगिक संदेश देणारे साहित्य पाठवणे.
- स्पॅम किंवा जाहिरात पाठवणे, ज्यात कमर्शियल वेबसाइटच्या लिंक्स पाठवणे किंवा उत्पादने किंवा सेवांच्या विक्रीचा प्रयत्न आहे.


आम्ही छळाच्या तक्रारी गांभीर्याने घेतो आणि तुम्हीही घ्यायला हव्यात. तुम्ही गोष्टी ऑफलाइन नेता तेव्हा तुम्हाला कोणी त्रास देत असेल तर आम्हाला कळणार नाही. तुम्हाला कोणी अॅपवर किंवा बाहेर त्रासदायक मेसेजेस पाठवत असेल तर आम्हाला इन-अॅप सेफ्टी सेंटरद्वारे कळवा आणि आम्ही त्यावर कारवाई करू.



Swipe and Swipe Right are registered trademarks of Match Group, LLC.

# अनमॅचिंग आणि तक्रार दाखल करणे

अनेक लोकांचा अनुभव सकारात्मक असला तरी प्रत्येकाचाच हेतू चांगला असेल असे नाही. तुम्हाला काहीही गडबड आढळल्यास किंवा कोणी मर्यादा ओलांडल्यास तुम्ही आम्हाला कळवा आणि अनमॅच करा. तसेच आमच्या अटींचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीला रिपोर्ट करा.




## टिंडर या गोष्टींसाठी नाही:

- ⊗ नग्नता/ शृंगारिक साहित्य
- ⊗ तोतया प्रोफाइल्स
- ⊗ पैसे किंवा देणग्यांची मागणी
- ⊗ कमी वयाच्या व्यक्तींकडून वापर किंवा तोतयेगिरी
- ⊗ खासगी माहितीचे ब्रॉडकास्ट- तुमची किंवा इतर कोणाचीही
- ⊗ स्पॅम किंवा जाहिरात जसे कमर्शियल वेबसाइटच्या लिंक्स किंवा उत्पादने किंवा सेवांची विक्री
- ⊗ छळ, तिरस्कारयुक्त संभाषण आणि अपमानजनक संदेश (एपवर आणि बाहेर)
- ⊗ वैयक्तिक भेटीदरम्यान किंवा नंतर हिंसाचार किंवा अयोग्य आणि घातक वर्तन.

## अनमॅच कसे करावे


तुम्हाला जोडीदारामध्ये रस नाही किंवा तुमचा जोडीदार चुकीच्या पद्धतीने वागू लागला आहे असे जाणवले तर तुम्ही त्यांना कधीही अनमॅच करु शकता.

तुम्ही एखाद्याला अनमॅच करता तेव्हा त्यांच्या मॅच यादीमधून तुम्ही आणि तुमच्या मॅच यादीमधून ते दिसेनासे होतील, तसेच ते तुम्हाला पाहू शकणार नाहीत किंवा संदेश पाठवू शकणार नाहीत.

एखाद्याला अनमॅच करण्यासाठी त्या व्यक्तीसोबतचे तुमचे चॅट खुले करा > उजव्या बाजूच्या वरील कोपऱ्यामधील फ्लॅग आयकॉन (आयओएस) किंवा एलिप्सी आयकॉन (अँड्रॉईड)वर टॅप करा > अनमॅच करा.



Swipe and Swipe Right are registered trademarks of Match Group, LLC.




# रोमान्स स्कॅम

डेटिंग अॅप्समुळे कोणाशीही कनेक्शन शोधणे आधीपेक्षा सोपे झाले आहे. तरीही इंटरनेटच्या गुणधर्मामुळे स्कॅम करणाऱ्यांना ही एक उत्तम संधी निर्माण झाली आहे. हे स्कॅमर्स अशा व्यक्तींचा शोध घेतात, ज्या कनेक्शन शोधण्यासाठी आधीच हतबल झालेल्या असतात आणि त्यांचा शोध लावणे कठीण असते. कधी-कधी एखादा गुन्हेगार तोतया व्यक्तिमत्व उभे करतो परंतु इतर लोक आपल्या खऱ्या ओळखीचा वापर करून रोमँटिक किंवा जवळच्या नात्याचे जाळे फेकून तुम्हाला गुंतवून फसवू शकतात. ते निरपराध वाटू शकतात परंतु तुम्ही त्याकडे नीट लक्ष दिले पाहिजे.

# स्कॅम कसा ओळखायचा:

## अनेक असतात परंतु क्रिप्टो तज्ञ असतात:

हार्ड पास. एक नवीन प्रेम पात्र तुम्हाला क्रिप्टो किंवा गुंतवणुकीचा सल्ला देत असेल तर हा स्कॅम असल्याची मोठी शक्यता असते. तुम्ही ज्या प्लॅटफॉर्मवर भेटलात तिथे या संवादांना तात्काळ रिपोर्ट करावा.

## गुंतवणुकीवर मोठ्या परताव्याचे किंवा सुरक्षित आर्थिक भवितव्याचे वचन:

स्कॅमर्स एखाद्या मोठ्या रकमेच्या परताव्यामुळे तुमचे आयुष्य कसे बदलेल किंवा तुम्ही या नवीन पैशांनी काय काय करू शकता यावर लक्ष वेधण्यासाठी नवनवीन तंत्रांचा वापर करतील. श्रीमंत आणि यशस्वी दिसणाऱ्या आणि कशा प्रकारे गुंतवणूक करून पैसे कमवावेत याचे सल्ले देऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींपासून सावध राहा.

## ते तुमच्या हृदयाशी खेळू शकतात आणि आतुर असल्याचे दाखवू शकतात:

स्कॅमर्स अनेकदा असा दावा करतात की त्यांना व्हिसा, कस्टम शुल्क, शस्त्रक्रिया, कौटुंबिक औषधांचि बिले, कार दुरुस्ती किंवा तुम्हाला भेटण्यासाठी प्लेन तिकिटांसाठी पैशांची गरज असल्याचा दावा करू शकतात. ते डेस्परेट असल्याचे दिसल्यास आणि पैशांचा समावेश असल्यास हा एक मोठा रेड फ्लॅग असू शकतो.

## स्कॅम्स वेगवेगळे असू शकतात आणि सातत्याने बदलत राहतात. सावध आणि दक्ष राहणे आवश्यक आहे

ऑनलाइन प्लॅटफॉर्म्स अधिक सहजसाध्य होऊन लोकप्रिय झाल्यामुळे ऑनलाइन स्कॅम्सही बदलले आहेत. स्कॅमर्स मोठा खेळ खेळतात. ते अगदी लगेच बाहेर येऊन पहिल्याच भेटीत तुमच्याकडून पैसे मागतीलच असे नाही. ते अनेक महिने तुमचा विश्वास संपादन करेपर्यंत पैशांबद्दल बोलत नाहीत. तुम्ही स्वतः कधीही न भेटलेल्या व्यक्तीसोबत वायर ट्रान्सफर, मनी ऑर्डर, चलनाची देवाणघेवाण, गिफ्ट कार्ड किंवा गुंतवणूक याद्वारे कधीही पैसे पाठवू किंवा स्वीकारू नयेत. कोणत्याही कारणासाठी नाही. कधीच नाही.



Swipe and Swipe Right are registered trademarks of Match Group, LLC.

## सगळे खूपच उत्तम आहे असे वाटते तेव्हा

वारंवार प्रेम किंवा लक्ष यांचे प्रदर्शन किंवा लव्हबॉम्बिंग हा एक रेड फ्लॅग आहे. स्कॅमरला लवकरात लवकर नाते स्थापित करायचे असते. त्यामुळे तुम्हाला कोणीही तुमची भेट "देवाने घडवलेली" असल्याचे सांगितल्यास, मोठमोठी वचने दिल्यास आणि लग्नासाठी खूप लवकर मागणी घातल्यास सावध व्हा.

## त्यांनी ऑनलाइन भेटण्यास टाळल्यास

स्कॅमर्स नेहमी प्लॅन करून शेवटच्या क्षणाला अज्ञात, अटळ आणि अनेकदा गंभीर परिस्थितीत भेटणे टाळतात. वैद्यकीय किंवा कुटुंबातील आपत्कालीन घटना किंवा त्यांना एखाद्या गोष्टीमुळे बाहेर जावे लागत असणे अशी कारणे देऊन ते तुमच्याकडून आर्थिक मदत मागतात.

## घोटाळ्यांपासून स्वतःचे रक्षण कसे करायचे:

स्कॅमरचा शोध घेण्याबरोबरच तुम्ही तुमच्या सुरक्षेवर नियंत्रण ठेवून स्वतःचे घोटाळ्यांपासून रक्षण करण्यासाठी अनेक गोष्टी करू शकता.

### प्रश्न विचारा

तुमच्या संभाव्य मॅचबद्दल माहिती मिळवण्याबरोबरच आवश्यक ते सर्व प्रश्न विचारून त्यांच्याकडून वैयक्तिक माहिती मिळवा. काही वेगळ्या किंवा विचित्र गोष्टी किंवा माहिती किंवा विशिष्ट प्रश्नांना मोघम उत्तरे मिळाल्यास ती धोकादायक असू शकतात.

### त्यांचे फोटो तपासा

घोटाळेबाज आपले स्वतःचे फोटो क्वचितच वापरतात. टिंडरच्या फोटो व्हेरिफिकेशन (Photo Verification)मुळे त्यांच्या प्रोफाइलमध्ये असलेली व्यक्ती एपमध्ये प्रकाशित केलेल्या विविध फोटोंमधलीच आहे याची खात्री करण्यास मदत मिळते. सुरक्षित मॅचसाठी फोटो व्हेरिफाय केलेल्या प्रोफाइलचाच विचार करा.

### आर्थिक माहिती देणे टाळा


तुमचा बँक खाते क्रमांक, क्रेडिट कार्ड माहिती किंवा इतर कोणतीही संवेदनशील आर्थिक माहिती तुम्ही ऑनलाइन भेटलेल्या व्यक्तीला देणे टाळा. स्कॅमर्स पैसे मागण्यापूर्वी विश्वास मिळवण्याचा किंवा तुमची आर्थिक माहिती मिळण्यासाठी एक वैध कारण देऊ शकतात. तुमची आर्थिक माहिती गोपनीय ठेवून स्वतःचे रक्षण करा.
स्वशिक्षित व्हा: तुमचा ऑनलाइन अनुभव सुरक्षित ठेवण्यासाठी सामान्य स्कॅम्सबद्दल माहिती ठेवा. स्वतःचे रक्षण करण्यासाठी टिंडरच्या सेफ्टी साधनांचा वापर करा आणि तुम्हाला काहीही संशयास्पद आढळल्यास इन-एप वैशिष्ट्याद्वारे तात्काळ त्याची नोंद करा. दक्ष आणि जागरूक राहिल्याने एक सुरक्षित आणि अधिक आनंददायी डेटिंगचा अनुभव घेता येईल.



Swipe and Swipe Right are registered trademarks of Match Group, LLC.

# तक्रार कशी करावी

तुम्ही एखाद्यासोबत मॅच केले आहे की नाही याची पर्वा न करता तक्रार करू शकता आणि तक्रारीसाठी अनेक कारणांमधून निवड करू शकता. त्वरित औपचारिक तक्रार करायची असो, अनमॅच करून नंतर तक्रार करायची असो किंवा टिंडरच्या सपोर्ट रिसोर्सेसच्या नेटवर्कपर्यंत पोहोचायचे असो आमची सुधारित रिपोर्टिंग प्रक्रिया सर्व्हायवर्सना पुढील उचलणाऱ्या पावलावर नियंत्रण ठेवण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे. सर्व्हायवर्सना उचलणाऱ्या पुढील पावलावर अधिक नियंत्रण देण्यासाठी RAINN कडून मार्गदर्शन घेत नुकतेच रिपोर्टिंग प्रक्रिया नव्याने डिझाइन करण्यात आली.




## मॅच करण्यापूर्वी तक्रार करणे

तक्रार करण्याची इच्छा असलेल्या व्यक्तीच्या प्रोफाइलवर क्लिक करा. वरील डाव्या बाजूस असलेल्या तीन डॉट्सवर क्लिक करा किंवा खाली स्क्रॉल करा आणि 'रिपोर्ट' बटनवर टॅप करत तुमचे कारण निवडा आणि आम्हाला त्वरित गोपनीय तक्रार पाठवा.

## मॅच झाल्यानंतर तक्रार करणे

तुमच्या मॅसेज स्क्रिनमधील उजव्या बाजूच्या वरील बाजूस असलेल्या शील्ड आयकॉनवर क्लिक करा आणि त्यानंतर येणाऱ्या आयकॉनवर टॅप करत तुमचे कारण निवडा आणि आम्हाला त्वरित, गोपनीय तक्रार पाठवा.

## अनमॅच केलेल्या एखाद्या व्यक्तीबाबत तक्रार करणे

मॅच यादीमध्ये सतत वाईट मॅच पाहत राहिल्याने त्रासदायक व आव्हानात्मक ठरू शकते, ज्यामुळे आम्ही वापरकर्त्यांना अनमॅच करण्यासाठी आणि अॅपमध्ये प्रत्यक्ष सहजपणे तक्रार करण्यासाठी आमची रिपोर्टिंग सिस्टम डिझाइन केली आहे. एखाद्याला अनमॅच केल्यानंतर तक्रार करण्याची क्षमता काही कारणांसाठी आवश्यक असू शकते. वापरकर्त्यांना आत्मविश्वास असला पाहिजे की ते एखाद्याला अनमॅच केल्यानंतर देखील जबाबदार धरू शकतात. म्हणून, आम्ही अॅपमध्ये तक्रार करण्याचे अधिक प्रत्यक्ष मार्ग निर्माण केला आहे.

## वापरकर्ता शारीरिकदृष्ट्या सुरक्षित असल्याची पुष्टी

स्क्रिन सादर करण्यात आली आहे, जी शारीरिक सुरक्षिततेबाबत चौकशी करते आणि गरज असल्यास कायदा अंमलबजावणी अधिकाऱ्यांशी संपर्क साधते.

## फोटो किंवा संदेशांबात तक्रार करणे, ज्यामुळे आम्ही त्वरित कारवाई करू शकतो


अयोग्य वर्तणूकीबाबत तक्रार न करण्यामागील अनेक कारणांपैकी एक म्हणजे तक्रार केल्यानंतर कारवाई न होण्याची भिती. आम्ही किमान फॉलो अपसह त्वरित योग्य कारवाई करत असल्याच या खात्रीसाठी वैयक्तिक फोटो किंवा संदेशांबाबत तक्रार करण्याचा पर्याय आणि अधिक खुल्या प्रतिसादांसाठी अधिक वाव दिला आहे. आम्ही इतरांसोबत ही माहिती शेअर करत नाही.



Swipe and Swipe Right are registered trademarks of Match Group, LLC.

# मी तक्रार केल्यानंतर कोणती कारवाई होते?

तुम्ही तक्रार करत तुमची जबाबदारी बजावली आहे, आता
पुढे आमची जबाबदारी आहे. तुम्ही टिंडरवर एखाद्या व्यक
तीबाबत तक्रार केल्यानंतर होणारी कारवाई पुढीलप्रमाणे:






### ***Final Review Screen:***

रिव्ह्यू स्क्रिन वापरकर्त्यांना इतर अतिरिक्त माहितीची भर करण्याची
आणि त्यांच्या तक्रारीच्या तपशीलाचे पुनरावलोकन करण्याची संधी
देते, ज्यामुळे ते आत्मविश्वासाने तक्रार सबमिट करू शकतात.

### ***Giving users choice over the information they receive:***


रिपोर्टिंगमधील शेवटची पायरी म्हणजे तक्रारीसंदर्भात करण्यात आलेल्या
कारवाईबाबत फॉलो-अप माहिती मिळवणे. आम्ही वापरकर्त्यांना त्यांच
या तक्रारीवरील लूप बंद करण्याचा पर्याय देतो. वापरकर्ते इच्छित असल
यास फॉलो-अप रिपोर्ट मिळण्याला नकार देऊ शकतात. हे तपशील पाहिजे
असलेल्यांसाठी युजर सपोर्ट टीम्सकडून अपडेटेड प्रतिसाद आम्ही आमच्या
मर्यादेत राहत वैयक्तिक तक्रारीबाबत केलेल्या कारवाईंबाबत अधिक सुस्पष
टता देतील.




### ***Greater transparency about the reporting process***

सर्व्हायवर्सना रिपोर्टिंग प्रक्रिया पूर्ण करण्यास प्रेरित करण
यासाठी प्रोग्रेस बार आहे, जो कारवाईसाठी लागणरा वेळ
आणि माहिती देते. या पहिल्या स्क्रिनमध्ये अॅक्सेस टू द
सेफ्टी सेंटरची भर करण्यात आली आहे, जे टिंडरवर रिपोर्टिंग
प्रक्रिया आणि करण्यात आलेल्या तक्रारीच्या बाबतीत करण
यात आलेल्या कारवाईबाबत अधिक माहिती देते.




### ***Every report taken seriously:***

गोपनीयता मार्गदर्शकतत्त्वांमुळे आम्ही तुम्हाला प्रत्येकवेळी तक्रारीचा तपशील देऊ
शकत नाही, पण प्रत्येक तक्रारीकडे गांभीर्याने लक्ष दिले जाते आणि काळजीपूर्वक
हाताळणी केली जाते. तुम्ही तक्रार केल्यानंतर तुमच्या मॅच यादीमध्ये विशिष्ट
अकाऊंट दिसणार नाही किंवा नवीन कनेक्शन्स शोधताना झळकणार नाही तुम्ही
दिलेला तपशील तक्रार केलेल्या व्यक्तीसोबत शेअर केला जाणार नाही. आमच्या
ट्रस्ट अँड सेफ्टी टीममधील सदस्य प्रकरणात लक्ष देत पुढील पायऱ्या निर्धारित करेल
आणि आमच्या कम्युनिटी गाइडलाइन्सनुसार कारवाई करेल. तुम्ही रिपोर्टिंगदरम्
यान ईमेल/अर्जाद्वारे तक्रार सबमिट केली असेल तर फॉलो-अपसाठी ऑटोमेटेड
प्रतिसादाला प्रतिक्रिया करू शकता.



Swipe and Swipe Right are registered trademarks of Match Group, LLC.

# Let's talk Gender

# समावेशकतेचे मूल्य जपणाऱ्या कनेक्शन्सना प्रोत्साहन

लैंगिक स्थिती हे एक असे स्पेक्ट्रम आहे, ज्यामध्ये ओळख अनुभवण्याचे आणि व्यक्त करण्याचे असंख्य मार्ग आहेत. ते पारंपारिक पुरुष-स्त्री द्विभाजनाच्या पलीकडे पसरलेले आहे, ज्यामध्ये विविध प्रकारच्या ओळखींचा समावेश आहे. सीएसआर इंडियाने मानवीय, न्याय्य आणि लैंगिक-समान प्रगतीचा पाया रचला आहे. दशकांच्या अनुभवासह त्यांनी समाजाच्या रचनेत लैंगिक विभागणी केली आहे.
बायनरीमध्ये स्वतःचे प्रतिनिधित्व करण्याच्या मर्यादा तोडणारी पहिली अॅप-आधारित डेटिंग सेवा म्हणून, टिंडरने नेहमीच वापरकर्त्यांना त्यांचे व्यक्तिमत्व आणि ते अॅप व आयआरएलमध्ये कसे दिसतात हे एक्सप्लोर करण्याची मुभा दिली आहे. २०२२ मध्ये, टिंडरने letstalkgender.in लॉंच केले - हा एक उपक्रम आहे, जो बायनरी रचनेच्या मर्यादा दूर करतो, सर्वनामांचे महत्त्व अधोरेखित करतो आणि समलैंगिक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व्यक्तीशी सहयोग करण्याबद्दलच्या प्रश्नांचे निराकरण करतो. अॅपवर उपलब्ध असलेल्या ५० हून अधिक लैंगिक अभिमुखता आणि ९ लैंगिक अभिमुखतांवरून संकेत घेत टिंडर अॅप आणि त्यापुढील सर्वसमावेशक डेटिंग अनुभवाला प्रोत्साहन देते.

## विविध ओळखींचा आदर करणे

ऑनलाइन डेटिंगचे सर्वसमावेशक क्षेत्र विविध क्षेत्रातील आणि लैंगिक ओळखींमधील व्यक्तींचे स्वागत करते. खरे संबंध निर्माण करण्यासाठी प्रत्येक अद्वितीय ओळखीचा आदर करणे आवश्यक आहे.

## विचारा, समजून घ्या, संबंध जोडा

तुमच्या शब्दांकडे लक्ष द्या, कारण त्यांचा मोठा प्रभाव पडतो. एखाद्याच्या लैंगिक किंवा ओळखीच्या बाबतीत अंदाज लावता येऊ शकत नाही - विचारणे हा नेहमीच योग्य दृष्टिकोन आहे. तुमचे सर्वनाम शेअर करून संभाषण सुरु करा आणि तुमच्या संभाव्य जुळणाऱ्यालाही तेच करण्यास आवाहन करा. प्रस्तावनेत तुमचे सर्वनाम व्यक्त करणे म्हणजे त्यांच्या सर्वनामांचा आदर करण्याप्रती तुमची कटिबद्धता दिसून येते आणि त्यांना परस्पर प्रतिसाद देण्यास प्रेरित करते.

## अर्थपूर्ण संबंधांसाठी मन मोकळे करा

ऑनलाइन प्रेमाच्या प्रवासाला सुरुवात करताना लक्षात ठेवा की सहानुभूती आवश्यक आहे. मोकळ्या मनाने संभाषण करा, असे करताना लक्षात ठेवा ओळखून की काही व्यक्ती स्वेच्छेने त्यांचे लैंगिक अनुभव शेअर करू शकतात तर काहीजण तसे करू शकत नाही. तुमच्या स्वतःच्या लैंगिकतेबाबत सांगणे हा मौल्यवान प्रयत्न आहे; प्रत्येक अनुभवाशी जुळवून न घेणे हे अगदी चांगले आहे. संभाव्य सहयोगींशी संवाद साधताना तुमच्या भावना आणि अनिश्चिततेबद्दल स्पष्ट राहा, कारण प्रामाणिक संवादामुळे खरे संबंध निर्माण होण्याचा मार्ग मोकळा होतो.

## जिज्ञासू राहा आणि माहिती जाणून घ्या

प्रामाणिक डेटिंग अनुभवाचा पाया म्हणजे सतत माहिती जाणून घेणे आणि परस्पर आदर. हा दीर्घकाळपर्यंत सुरु राहणारा प्रवास आहे. विविध दृष्टिकोन स्वीकारा, विविध लोकांशी संवाद साधा आणि तुमचे ज्ञान वाढवण्यासाठी नवीन संकल्पनांना आत्मसात करा. मन मोकळे केल्यास तुम्ही लैंगिक गुंतागुंतींना तोंड देण्यासाठी आणि अर्थपूर्ण संबंध निर्माण करण्यासाठी सुसज्ज असाल.


Swipe and Swipe Right are registered trademarks of Match Group, LLC.

# संसाधने

- One Future Collective (+९१ ९०१९५ ४८७९२)
  सामाजिक न्याय समर्थनासाठी एक स्त्रीवादी तरुणांच्या नेतृत्वाखालील ना-नफा तत्त्वावर आधारित संस्था आहे.

- Umang LBT Support Group (+९१ ९९३०० ९५८५६)
  लेस्बियन महिला, उभयलिंगी महिला आणि ट्रान्सजेंडर व्यक्तींसाठी समुदाय समर्थन गट आहे.

- Pink Legal (+९१ ९९५९९ ०४४००)
  महिला हक्क आणि महिला कायद्यांना समर्पित ही भारतातील पहिली वेबसाइट आहे.

- The Humsafar Trust (+९१ ९८९२९ ४०९६६)
  भारतातील एलजीबीटीक्यूए+ अधिकार समर्थन गट आहे.

- National Commission For Women (०११ २६९४२३६९, ०११ २६९४४७५४)
  ही भारतातील महिलांच्या हितांचे रक्षण आणि प्रोत्साहन देणारी सरकारी संस्था आहे.

- National Cyber Crime Reporting (१९३०)
  सायबर गुन्ह्यांच्या पीडितांना ऑनलाइन तक्रारी दाखल करण्यास मदत करण्यासाठी हा सरकारी उपक्रम आहे.
- Women In Distress (१०९१)
  संकटात सापडलेल्या महिलांना किंवा आपत्कालीन परिस्थितीत मदत करण्यासाठी सरकारी हेल्पलाइन क्रमांक आहे.

- National Human Right Commision (०११ २३३८५३६८, +९१ ९८१०२९८९००)
  ही मानवी हक्कांच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी स्थापन केलेली संस्था आहे.

- Delhi Commission for Women (०११ २३३७९१८१, ०११ २३३७०५९७)
  दिल्लीतील महिलांच्या सुरक्षिततेशी संबंधित सर्व बाबींची चौकशी आणि तपासणी करण्यासाठी स्थापन केलेली वैधानिक संस्था आहे.

- All India Women's Conference (१०९२१, ०११ २३३८९६८०)
  ही भारतातील महिलांच्या हक्कांना पाठिंबा देण्यासाठी समर्पित ना-नफा तत्त्वावर आधारित संस्था आहे.

- Women Helpline Domestic Abuse (१८१)
  ही हेल्पलाइन आहे, जी हिंसाचाराने ग्रस्त महिलांना २४ तासात त्वरित आणि आपत्कालीन प्रतिसाद देते.

- Crisis Intervention Centre (+९१ ०११ ४६१३१९२९)
  हा सीएसआर इंडियाचा प्लॅटफॉर्म आहे, जो लैंगिक हिंसाचार, भेदभाव किंवा हल्ल्यांना आयआरएलच्या माध्यमातून आणि ऑनलाइन प्रतिसाद देतो.



Swipe and Swipe Right are registered trademarks of Match Group, LLC.


tinder